**ठळक बातम्या**

- देशातले महिला सुरक्षेचे कायदे सक्रिय करण्याची आणि या प्रकरणांचा निकाल लवकर लावण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी दाखवला हिरवा झेंडा

- नाशिक - डहाणू ब्रॉडगेज रेल्वे लाईन प्रकल्पाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणासाठी अडीच कोटींच्या निधीला रेल्वे मंत्रालयाची मंजुरी

- जागतिक अंडर-२० ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये १० हजार मीटर चालण्याच्या स्पर्धेत आरतीची कांस्यपदकाला गवसणी

**आणि**

- अरबी समुद्रावरल्या ‘आस्ना’ चक्रीवादळामुळे मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

देशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कडक कायदे लागू केले आहेत. हे कायदे आणखी सक्रीय करायची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. अशा प्रकरणांचे निकाल जितक्या लवकर लागतील, तितकी आपण सुरक्षित असल्याची खात्री महिलांना पटेल, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन त्यांनी आज केलं. त्यानंतर ते बोलत होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक विशेष टपाल तिकीट आणि एका नाण्याचं प्रकाशनही मोदी यांच्या हस्ते झालं. सर्वोच्च न्यायालयाचा ७५ वर्षांचा प्रवास लोकशाहीची जननी म्हणून भारताची शान आणखी वाढवतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. हा प्रवास भारताच्या राज्यघटनेचा

आणि राज्यघटनेनं दिलेल्या मूल्यांचा आहे, असं ते म्हणाले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनीही जिल्हास्तरीय न्यायपालिका परिषदेला संबोधित केलं.

या परिषदेमुळे जिल्हास्तरीय न्यायपालिका आणि इतरांमध्ये संवादाला वाव मिळेल, असं मत त्यांनी मांडलं. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी, ई-न्यायालय उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी ७ हजार २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी, सर्वोच्च न्यायालयाच्या बार काउन्सिलचे अध्यक्ष कपिल सिबल, भारताच्या बार काऊन्सिलचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांनीही या परिषदेत उपस्थितांशी संवाद साधला.

**<><><><><>**

वंदे भारत रेल्वेगाड्यांचा वाढता विस्तार, आधुनिकता आणि वेग हे विकसित भारताच्या दिशेनं पडलेलं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मीरत-लखनौ, मदुराई-बेंगळुरू आणि चेन्नई-नागरकोईल या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या गाड्यांमुळे देशातली महत्त्वाची शहरं आणि ऐतिहासिक शहरं जोडली जातील, मंदिरांचं शहर असा लौकिक असलेलं मदुराई माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रणी असलेल्या बेंगळुरूशी जोडलं जाईल, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. वंदे भारत जिथं पोहोचते आहे, तिथं पर्यटकांची संख्या आणि पर्यायानं तिथले उद्योग, रोजगाराच्या संधी वाढत आहेत, अनेक मार्गांवर वंदे भारत रेल्वे सुरू करण्याची मागणी होत असून या गाडीतही लवकरच स्लीपर कोच सुरू होणार असल्याची माहितीही प्रधानमंत्री मोदी यांनी दिली.

**<><><><><>**

विधानसभेची ही निवडणूक आपण अतिशय गांभीर्याने घेतली पाहिजे, महिला

आणि युवकांनी या निवडणुकीत सतर्क राहिले पाहिजे अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचं 'राज्यस्तरीय महिला व युवा पदाधिकारी अधिवेशन' मुंबईतल्या महिला आर्थिक विकास मंडळाच्या सभागृहात कालं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

आपण धर्मनिरपेक्ष विचार सोडलेला नसून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिव-शाहू - फुले - आंबेडकरांच्या विचारधारेवरच पुढे चालला असल्याचं अजित पवार यांनी स्पष्ट केले. या अधिवेशनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, रूपाली चाकणकर, सुरज चव्हाण, शिवाजीराव गर्जे उपस्थित होते.

**<><><><><>**

नाशिक - डहाणू नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईन प्रकल्पाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणासाठी एकूण दोन कोटी ५० लाख रुपयांचा निधी खर्च करायला रेल्वे मंत्रालयानं मंजुरी दिली आहे. त्र्यंबकेश्वर आणि वाणगाव मार्गे नाशिक ते डहाणू हा १०० किलोमीटरचा रेल्वे मार्ग दोन प्रमुख शहरांना जोडेल. १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी आणि नाशिकमधल्या पंचवटी इथं दर्शनासाठी जाणाऱ्या लाखो भाविकांना रेल्वेसेवा उपलब्ध करून देत, पर्यटनाला चालना देण्यासाठी हा नवीन रेल्वे मार्ग महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळं नाशिक आणि पालघर जिल्ह्यातली अनेक शहरं जोडली जातील तसंच या प्रदेशातल्या आर्थिक वाढ आणि विकासाला चालना मिळेल.

**<><><><><>**

खादी आणि ग्रामोद्योग योजनांवर लक्ष केंद्रित करून त्याच्या अंमलबजावणीसाठी सखोल आणि विस्तृत प्रयत्नांची गरज असल्याचं केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री जितन राम मांझी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत खादी महोत्सव २०२४ च्या आढावा बैठकीत बोलत होते. देशात खादीला चालना मिळण्यासाठी येत्या ऑक्टोबर महिन्यात खादी आणि ग्रामोद्योग आयोगानं

या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. देशभरात लोकांना खादीची वस्त्रं वापरण्यासाठी प्रोत्साहन देत ग्रामीण भागात रोजगार निर्मितीत योगदान द्यावं, असं आवाहन मांझी यांनी केलं आहे.

**<><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून दोन दिवसांच्या उत्तराखंड दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते देहरादूनमधल्या CSIR - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम इथं शास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी चर्चा करतील. तसंच ते राष्ट्रीय भारतीय लष्करी महाविद्यालय आणि एम्स संस्थेलाही भेट देणार आहेत.

**<><><><>**

हवाई गुणवत्ता निर्धारण महासंचलनालयानं आज देशभरात स्थापना दिवस साजरा केला. नाशिक जिल्ह्यात ओझरमध्ये यानिमित्त विशेष पंधरवड्याचं आयोजन झालं. HAL मधल्या कार्यालयाकडून यापूर्वी रशियन विमानांच्या दर्जावर देखरेख ठेवली जात होती. आता पश्चिमी देशातून आलेल्या विमानांच्या देखरेखीचं काम आलं आहे. या कार्यालयातले कर्मचारी यासाठी सज्ज असल्याचं अतिरीक्त महासंचालक सतिश कुमार यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारताच्या युनिफाईड पेमेंट इंटरफेसमधून या वर्षीच्या एप्रिल ते जुलै मध्ये एक्याऐंशी लाख कोटी रुपयांची देवघेव झाली. जगातल्या डिजिटल पेमेंट मंचांना मागे टाकत भारतात या माध्यमातून होणाऱ्या पैशाच्या देवाणघेवाणीमध्ये वार्षिक ३७ टक्के वाढ होत आहे. ग्लोबल पेमेन्ट हब पेसिक्युअरनं दिलेल्या माहितीनुसार भारतात या माध्यमातून दर सेकंदाला ३ हजार ७२९ व्यवहार होतात.

**<><><><>**

पंजाबमध्ये पाणीटंचाईची स्थिती चिंताजनक झाली असून अनेक जिल्ह्यात भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. राज्यातल्या २३ जिल्ह्यांपैकी ८

जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून अन्य ९ जिल्ह्यांमध्येही पाणी पातळीची अवस्था बिकट आहे. केंद्रीय भूजल मंडळाच्या अहवालानुसार राज्यभरात केवळ १७ अब्ज क्युबिक मिटर भूजल उपलब्ध आहे.

<><><><>

धुळे पोलीस दलात नवीन भरती झालेल्या प्रशिक्षणार्थींचा दिक्षांत सोहळा आज सकाळी झाला. धुळ्याच्या कवायत मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात विशेष पोलीस महानिरिक्षकांनी पोलीस प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रक दिलं. उत्तम कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा त्यांनी यावेळी सत्कार केला. यावेशी धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, उपवनसंरक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे, राज्य राखीव पोलीस बल गटाचे समादेशक आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

बुलढाणा जिल्ह्यातल्या गिरडा गावात गोंधण खेड शिवारात काल बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. गिरडा इथले शेतकरी सुनील जाधव हे आपलं शेत राखण्यासाठी जात असतांना बिबट्यानं त्यांच्यावर हल्ला केला. बिबटयानं त्यांचा गळा धरुन त्यांना ५० मीटर खोल दरीत फरफटत नेलं. त्यात त्यांचा मृत्यू झाला. वनविभाग आणि गावकऱ्यांनी त्यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात आणला.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत गतविजेता नोव्हाक जोकोविचला ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्सेई पॉपिरिन यानं पराभवाचा धक्का दिला. पॉपिरिननं जोकोविचवर ६-४, ६-४, २-६, ६-४ अशी मात केली. एका वर्षात एकही ग्रँडस्लॅम जिंकण्यात अपयशी ठरण्याची जोकोविचची २०१७ नंतरची ही पहिलीच वेळ आहे.

दरम्यान, भारताचा युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच जोडीदार अल्बानो ऑलिवेट्टी यांनी पुरुष दुहेरीत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. तत्पूर्वी, रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्देन या जोडीनं उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. एन. श्रीराम बालाजी आणि त्याच्या अर्जेंटिनाच्या जोडीदाराला पराभवाला सामोरं जावं लागलं.

<><><><><>

पॅरिस पॅरालिम्पिक खेळांमध्ये महिलांच्या १० मीटर एयर रायफल स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावत भारताचं नाव पदक विजेत्या देशांच्या  यादीत झळकावल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेमबाज अवनी लेखरा हिचं अभिनंदन केलं आहे. देशाला तिच्या ऐतिहासिक आणि असामान्य कामगिरीचा अभिमान असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. पुरुषांच्या १० मीटर एयर पिस्तुल स्पर्धेत रौप्य पदक पटकावणारा मनीष नरवाल, महिलांच्या १० मीटर एयर रायफल स्पर्धेत कांस्य पदक पटकावणारी मोना अग्रवाल आणि महिलांच्या १०० मीटर स्पर्धेत  कांस्य पदक जिंकणाऱ्या  प्रिती  पालचंही राष्ट्रपतींनी अभिनंदन केलं.

<><><><><>

पेरूमधील लिमा इथं सुरू असलेल्या जागतिक अंडर-२० ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये भारताच्या आरतीनं काल १० हजार मीटर चालण्याच्या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. चीनच्या झुओमा बैमा हिनं सुवर्ण तर चीनच्याच मेलिंग चेन हिनं रौप्य पदक पटकावलं.

<><><><><>

आस्ना या चक्रीवादळाचा प्रवास येत्या चोवीस तासात देशाच्या वायव्य आणि इशान्य भागाकडे सुरू होईल, असं भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्राचा मध्य भाग, विदर्भ इथं तसंच कोकण किनारपट्टी आणि गोव्यात पुढच्या आठवड्यात मुसळधार पाऊस पडेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

मोसमी पावसाचा मुक्काम यंदा लांबण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे. रब्बी पिकांना उपयुक्त असणाऱ्या या पर्जन्यमानामुळे रब्बी लागवडीचं क्षेत्रही वाढू शकेल. मराठवाड्यात काही ठिकाणी येत्या चोवीस तासात पाऊस होईल असा विभागाचा अंदाज आहे. जालना जिल्ह्याला तीन सप्टेंबरपर्यंत यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**